

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner





Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

विद्या विकास मंडळाचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय,

**अक्कलकुवा.** ता.जि.नंदुरबार,फोन नं.ऑ.२५२३५७

## राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक उपक्रमांचे शैक्षणिक अहवाल वर्ष २०१७-१८

राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक उपक्रमांच्या नियोजनाअंतर्गत वार्षिक उपक्रमांचा अहवाल जून २०१७ ते एप्रिल २०१८ आम्ही सादर करीत आहोत.

आमच्या महाविद्यालयातील रासेयोच्या (एककास)नियमित कार्यक्रमासाठी २२० स्वयंसेवक व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीरासाठी ११० स्वयंसेवकांची मंजूरी विद्यापीठाने दिलेली आहे.

आम्ही रासेयोचे कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या वार्षिक कार्यक्रमाचे उपक्रम खालील प्रमाणे राबविले आहे.नियमित कार्यक्रम दि.२५/६/२०१७ रोजी महाविद्यालयीन परिसराची स्वच्छता केली.या एकदिवशीय शिबीरात १८० विद्यार्थ्यांच्या युनिटने सहभाग घेतला.विद्यार्थ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला.

दि.१२/७/२०१७ रोजी अक्कलकुवा महाविद्यालयात वृक्षारोपन कार्यक्रम घेण्यात आला.त्यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एस.पैठणे,तहसीलदार मा.श्री.नितीनकुमार देवरे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.महाविद्यालयाच्या परिसरात एकूण १०० झाडांची लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला.

दि.१४/८/२०१७ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व तयारीसाठी महाविद्यालयात स्वच्छता शिबीराचे आयोजन केले.त्यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.विद्यार्थ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला.

दि.११/९/१७ रोर्ज' बेटी बचाव व महिला संरक्षणानिमित्त संपूर्ण गावात जागृती रॅली काढण्यात आली.व ठिकठिकाणो पथनाट्य सादर करून मुलींचे प्रमाण वाढले पहिजेत याबाबत जागृती करण्यात आली यात महाविद्यालयाचे प्राचार्य,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व एकूण विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.विद्यार्थ्यांना [illegible] व नाश्ता देण्यात आला.

दि.२४/९/२०१७ रासेयोच्या दिना 1/6 एकदिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात आले.त्यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.रासयोचे महत्व विद्यार्थ्यांना समजवण्यात आले.विद्यार्थ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला.

Scanned with CamScanner

दि.१.१०.१७ रोजी एचआयव्ही विषयक विद्यार्थ्यांमध्ये जाणिव निर्माण व्हावी व सातपुड्यातील रानावनातील आदिवासी बांधवांमध्ये रासेयोचे स्वयंसेवकांनी एचआयव्ही विषयक जनजागृती करावी यानिमित्ताने कुटीर रूग्णालयातील डॉक्टरांनी कॅम्प घेवून मार्गदर्शन केले. त्यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.विद्यार्थ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला.

दि.२.१०.१७ महात्मा गांधी जयंती निमित्त प्रा.ए.व्ही.बाविस्कर व प्रा.एन.डी.भामरे यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. व महाविद्यालयाची सफाई करण्यात आली.त्यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.विद्यार्थ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला.

दि.२४/१०/१७ रोजी दत्तक गांव कुंभारखान येथे एकदिवशीय शिबीराचे आयोजन करण्यात आले.संपूर्ण गावात ग्रामस्वच्छता करण्यात आली.यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.विद्यार्थ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला.

दि.१९/११/१७ राष्ट्रीय एकात्मता दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात वृक्षसंवर्धन करण्यात आले.व एकात्मतेचे महत्व याविषयावर मा.उपप्राचार्य प्रा.एस.बी.पाटील यांचे व्याख्यान ठेवण्यात आले.यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.विद्यार्थ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला.

दि.२५/१/१८ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व तयारी करीता एकदिवसीय शिबीर घेण्यात आले.त्यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.विद्यार्थ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला.

दि.८/३/१८ महिला दिनाच्या निमित्ताने सौ.एस.एस.पवार (विद्यार्थी कल्याण अधिकारी) यांचे व्याख्याने आयोजित करण्यात आले.त्यातविद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.विद्यार्थ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला.

याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना शस्त्र संबंधी ज्ञान तसेच स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टीने कार्यक्रम घेण्यात आले.यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एस.पैठणे व कार्यक्रम अधिकारी प्रा.जे.बी.बागुल ,विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.ए.व्ही. बाविस्कर, सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.जी.वसावे व प्रा.एस.एस.पवार यांनी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या वार्षिक उपक्रमात सहभाग घेवून विविध कार्यक्रम यशस्वीपणे राबविले.

( PROF.M.G.VASAVE )
Program Officer
N.S.S. - Programme Officer
V.V.M's Arts & Com.College

( DR.A.S.PAITHANE )
Principal
PRINCIPAL
V.V.M's, Arts & Commerce College,



Scanned with CamScanner

विद्या विकास मंडळाचे
**कला व वाणिज्य महाविद्यालय,**
**अक्कलकुवा**, ता.जि.नंदुरबार,फोन नं.ऑ.२५२३५७
**राष्ट्रीय सेवा योजना**

# श्रमसंस्कार हिवाळी शिबीर अहवाल वर्ष २०१७-१८

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव व कला आणि वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रा.से.योजना विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार व व्यक्तीमत्व विकास शिबीराचे आयोजन महामहिम राज्यपाल व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव यांनी दत्तक घेतलेले गाव देवमोगरा पुर्नवसन येथे दि.२८/१२/२०१७ पारून आयोजित करण्यात आले. यात ११० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. दि.२८/१२/२०१७ रोजी ठिक १०.३० वाजता मा.श्री.प्रतापदादा वसावे यांच्या अध्यक्षतेखाली तर शिबीराचे उद्घाटन जि.प.शाळा देवमोगरा पुर्नवसन येथील इ.४थीची विद्यार्थीनीच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.ए.एस.पैठणे, उपप्राचार्य प्रा.एस.बी.पाटील हे उपस्थित होते.

दि.२९/१२/२०१७ रोजी उद्घाटन झाल्यानंतर १० बाय १० स्वयंसेवकांचे गृप पाळण्यात आले. दुपारी मा.माधव कदम यांनी जातीमुक्त भारत याविषयावर व्याख्यान दिले. रात्री भोजनानंतर सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात आले.

दि.३०/१२/२०१७ रोजी सकाळी योगासन व व्यायाम झाल्या नंतर प्रार्थना वगैरे करून नाश्ता झाल्यावर श्रमदानासाठी स्वयंसेवकांना पाठविण्यात आले. २ वाजता जेवण करून ३ वाजता मा.सुनिल डेरे यांचे ''सोशन मिडीयाचा समाजावर होणारा परिणाम'' या विषयावर सखोल मार्गदर्शन झाले. गृप चर्चेमध्ये माझे ''रा.से. योजनेत येत्या मागील उद्दिष्टे'' हा विषय सखोल चर्चा झाली . रात्री भोजन करून विविध पथनाट्य सादर करण्यात आले व या पथनाट्याच्या माध्यमातून व्यसनमुक्ती,डाकीण प्रथा,अंधश्रध्दा,निरक्षरता इ.विषयांवर नाटिका सादर केल्या.

दि.३१/१२/२०१७ रोजी सकाळी योगासन व्यायाम् नाश्ता करून गावकऱ्यांच्या विनंती वरून नदीवर बांध बांधण्यात आले. व श्रमदानातून शोषखड्डे बनविण्यत आले. दुपारी

Scanned with CamScanner

जेवण झाल्यानंतर ३ वाजता श्री.आर.सी.वळवी यांचे ''एक पाऊल डिजीटल साक्षरतेकडे '' ह्या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. संध्याकाळी गटचर्चेमध्ये ''शेतकऱ्यांची आत्महत्या'' ह्या विषयावर चर्चा करण्यात आली.रात्रीचे जेवण करून आदिवासी ढोलवर नृत्य करण्यात आले.

दि.०१/०१/२०१८ रोजी योगासन व व्यायाम झाल्यानंतर स्वयंसेवकांनी रस्त्यालगत मोठे मोठे उकीरडे होते ते साफ केले.दुपारचे जेवण झाल्यानंतर ३ वाजता व्याख्यान सत्रात मा.कैलास चौधरी यांनी ''व्यसनमुक्त भारत ''या विषयावर व्याख्यान झाले. गृप चर्चेत ''स्त्री भ्रूण हत्या ''ह्या विषयावर सखोल गटचर्चा झाली. आणि रात्री संास्कृतीक कार्यक्रम घेण्यात आले.

दि. ०२/०१/२०१८ रोजी योगासन व व्यायाम झाल्यावर श्रमदानातून सर्वे करून कॅशलेस विषयी माहीती देवून सर्वेक्षण करण्यात आले. दुपारचे भोजन झाल्यावर ३ वाजता मा.नितीन चौधरी यांचे 'जल,जंगल व जमीन 'या विषयावर व्याख्यान झाले .संध्याकाळी भोजन करून पथनाट्य व आदिवासी नृत्य करून गावकऱ्यांना विविध संदेश दिलेत.

दि.०३/०१/२०१८ रोजी सकाळी योगासन व व्यायाम झाल्यावर परिसर स्वच्छ केला. सकाळी ११.३० वाजेपर्यंत पुर्ण केलेत. १ वाजता समारोप करण्यासाठी जि.प.सदस्य,समाज भुषण विजेते,सामाजिक कार्यकर्ता प्रतापदादा वसावे ह्यांच्या अध्यक्षतेखाली समारोप करण्यात आला. या प्रसंगी समारोपकर्ते प्राचार्य डॉ.ए.एस.पैठणे,उपप्राचार्य प्रा.एस.बी.पाटील आदि हजर होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.एम.एल.सावंत यांनी केले. अहवाल कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.जी.वसावे यांनी मांडला तर आभार सौ.एस.एस.पवार यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी पं.स.उपभापती पिरसिंग दादा वसावे,सरपंच देवमोगरा पुर्नवसन, मा.उग्रावण्या वसावे ,प्राचार्य डॉ.ए.एस.पैठणे, उपप्राचार्य प्रा.एस.बी.पाटील,कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.जी.वसावे,सहा.कार्य.अधिकारी प्रा.एम.एल.सावंत,प्रा.सौ.एस.एस.पवार व योगेश सोनवणे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रम अधिकारी

(प्रा.एम.जी.वसावे)

N.S.S. - Programme Offic.
V.V.M's Arts & Com.College
Akkalkuwa Dist Nandurba

प्राचार्य

(डॉ.ए.एस.पैठणे)

PRINCIPAL
V.V.M's, Arts & Commerce College,
Akkalkuwa Dist. Nandurbar

Scanned with CamScanner